शुक्रवार दि. २४ जुलै २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३२३ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 | yuva.aadarsh@gmail.com | 8390048886

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ | https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ | https://twitter.com/Yuva_aadarshjln/ | RNI: MAHMAR/2019/78282

जीवनदाता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नेतृत्वात शेतकऱ्यांना १.१४ लाख कोटींचा ऐतिहासिक दिलासा

# जालन्यात २.०५ लाख शेतकऱ्यांना २,१९१ कोटींच्या कर्जमाफीचा लाभ

## आमदार बबनराव लोणीकर यांची पत्रकार परिषद

**जालना । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने शेतकरी हिताला सर्वोच्च प्राधान्य देत कर्जमाफी, वीजबिल माफी, मोफत वीज, सौर कृषी पंप, सिंचन आणि कृषी विकास योजनांच्या माध्यमातून राज्यातील लाखो शेतकऱ्यांना आर्थिक बळ दिले आहे. कर्जमाफी आणि वीजबिल माफी मिळून राज्यातील शेतकऱ्यांना तब्बल ₹१ लाख १४ हजार ५८५ कोटींचा आर्थिक दिलासा देण्यात आला असून, ही राज्याच्या कृषी इतिहासातील महत्त्वाची आणि ऐतिहासिक मदत असल्याचा दावा माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर यांनी केला. गुरुवारी (दि. २३) नवीन मोंढा रोडवरील द फर्न हॉटेल येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी आमदार नारायण कुचे, माजी आमदार कैलास गोरंट्याल, भाजप महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे, संभाजी वारे, सुजित जोगस, सर्जेराव जाधव, शिवराज नारियलवाले यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

ते म्हणाले की, मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्यात लोकाभिमुख, पारदर्शक आणि गतिमान प्रशासनाची नवी कार्यसंस्कृती निर्माण केली असून शासनाच्या योजना नागरिकांच्या दारापर्यंत पोहोचविण्याचा त्यांचा सातत्याने प्रयत्न राहिला आहे.





**५६ लाख शेतकऱ्यांसाठी ₹३६,५८५ कोटींची कर्जमाफी**

राज्य शासनाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी सन्मान योजना अंतर्गत ₹३६,५८५ कोटींच्या कर्जमाफीला मंजुरी दिली आहे. या योजनेचा लाभ राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांना मिळणार आहे. या योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांचे मुद्दल व व्याजासह ₹२ लाखांपर्यंतचे अल्पमुदतीचे पीक कर्ज माफ करण्यात येणार आहे. तर ₹२ लाखांपेक्षा अधिक थकीत कर्ज असलेल्या शेतकऱ्यांसाठी वन टाइम सेटलमेंट () ची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

याशिवाय नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ₹५० हजारांपर्यंत प्रोत्साहनपर अनुदान देण्याचाही महत्त्वपूर्ण निर्णय शासनाने घेतल्याची माहिती लोणीकर यांनी दिली.

सुरुवातीला १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या *(पान २ वर)*

# श्री क्षेत्र विठ्ठल माळावर आषाढी एकादशीचा भक्तिमय सोहळा

## ३० ते ३५ गावांतील दिंड्यांनी हिवरा तपेश्वर परिसर दुमदुमणार; मंदिर समितीकडून जय्यत तयारी

**जालना । रवि शिंदे**

तालुक्यातील निसर्गरम्य हिवरा तपेश्वर परिसरात वसलेल्या श्री क्षेत्र विठ्ठल माळावर यंदाची आषाढी एकादशी मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात साजरी करण्यासाठी मंदिर समितीकडून जय्यत तयारी करण्यात आली आहे. चोहोबाजूंनी डोंगररांगांनी वेढलेल्या या पवित्र क्षेत्रात दरवर्षीप्रमाणे यंदाही हजारो भाविक विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी दाखल होण्याची शक्यता आहे. त्यामुळे संपूर्ण परिसरात आधीपासूनच भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.वैकुंठवासी म्हातार बाबा शिंदे यांच्या प्रेरणेने उभारण्यात आलेले हे भव्य





विठ्ठल-रुक्मिणी मंदिर आज पंचक्रोशीतील वारकऱ्यांचे श्रद्धास्थान बनले आहे. आषाढी एकादशीच्या निमित्ताने येथे दर्शन, हरिनाम सप्ताह, भजन-कीर्तन, दिंडी सोहळा आणि धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.३० ते ३५ गावांमधून निघणार दिंड्यायंदाच्या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे पंचक्रोशीतील सुमारे ३० ते ३५ गावांमधून पारंपरिक वेशभूषेत आणि टाळ-मृदुंगाच्या गजरात निघणाऱ्या दिंड्या होय. हिवरा तपेश्वर, खणेपुरी, भाटेपुरी, वानडगाव, थेरगाव, पाचनवडगाव, हिस्वण, माळी पिंपळगाव, कारला, हातवन, वडीवाडी *(पान २ वर)*

# महापौरांना नगरसेवकाला नोटीस बजावण्याचा अधिकार नाही

## श्रीकांत पांगारकरांचा गंभीर आरोप; कायदेशीर लढा देण्याचा इशारा

**जालना । प्रतिनिधी**

जालना महानगरपालिकेच्या महापौर वंदना मगरे यांनी नगरसेवकाला नोटीस बजावणे हे नियमबाह्य असून त्यांना असा अधिकारच नसल्याचा गंभीर आरोप अपक्ष नगरसेवक श्रीकांत पांगारकर यांनी केला आहे. महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत आपण कोणतेही आक्षेपार्ह वक्तव्य केले



नसतानाही राजकीय दबावातून आपल्याला नोटीस देण्यात आल्याचा दावा त्यांनी केला. गुरुवारी (दि. २३) शहरातील एका हॉटेल येथे आयोजित पत्रकार परिषदेत पांगारकर यांनी आपली भूमिका मांडली. यावेळी त्यांनी सर्वसाधारण सभेतील घटनाक्रमाची व्हिडिओ क्लिप पत्रकारांना दाखवत, सभेत आपण एकही आक्षेपार्ह शब्द उच्चारला नसल्याचा दावा केला. *(पान २ वर)*

# जिल्हाधिकारी कार्यालयात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांना अभिवादन



**जालना - प्रतिनिधी**

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शशीकांत हदगल.

उपजिल्हाधिकारी मनिषा दांडगे, नायब तहसिलदार तुषार निकम, विक्रांत मोंढे, सतीश तायडे, किशोर तायडे, नीलम लुनावत, पी.डी. शिंदे, संतोष पगार, संतोषी सुर्यवंशी, सहाय्यक महसुल अधिकारी संध्या सुखदेवे, अनिरुध्द झुंबड, दिपाली राऊत (वानखडे), शिल्पा मगरे, संपदा कुलकर्णी, स्वाती राठोड, श्री. सानप, अनंत जुन्नारे, विठ्ठल बोरकर, अतुल केदार,वैशाली नवले, सविता भोकरे, कुंता पठाडे, सुनिल काळुंके व इतर तसेच प्रशासकीय इमारतीमधील विविध कार्यालयाचे अधिकारी-कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# देशाच्या विकासासाठी आणि धोरणनिर्मितीसाठी एनएसओतर्फे २०२६-२७ मध्ये विविध सर्वेक्षणांद्वारे महत्वपूर्ण माहितीचे संकलन

*रोजगार, महागाई, उद्योग आणि कौटुंबिक उत्पन्नाचा घेणार वेध; संख्या मित्रां मार्फत होणार माहिती संकलन*

**जालना - प्रतिनिधी**

: भारत सरकारच्या सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय () अंतर्गत कार्यरत राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय () देशातील सामाजिक व आर्थिक विकासासाठी आवश्यक असलेली विविध सर्वेक्षणे नियमितपणे राबवत आहे. या सर्वेक्षणांद्वारे रोजगार, उद्योग, महागाई, शेती, स्थलांतर, कोळसा उत्पादन आणि सेवा क्षेत्राशी संबंधीत विश्वासार्ह माहिती संकलित केली जाते. ही माहिती केंद्र व राज्य सरकारला विकास आराखडे तयार करण्यासाठी, विविध योजना आखण्यासाठी आणि धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरते.

सन २०२६-२७ या कालावधीत मार्फत विविध महत्त्वाची सर्वेक्षणे राबविण्यात येणार असून त्यामध्ये सांख्यिकी अधिकारी, वरिष्ठ सांख्यिकी अधिकारी, सर्वेक्षण पर्यवेक्षक तसेच सर्वेक्षण गणक यांची महत्त्वपूर्ण भूमिका असणार आहे. त्यांची सविस्तर माहिती खालील प्रमाणे आहे.

नियतकालिक श्रमशक्ती सर्वेक्षण ():
नियतकालिक श्रमशक्ती सर्वेक्षण () हा सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाच्या () अंतर्गत असलेल्या राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाद्वारे () केला जाणारा एक देशव्यापी घरगुती सर्वेक्षण उपक्रम आहे. यातून भारतातील रोजगार आणि बेरोजगारीबाबत नियमित व व विश्वसनीय माहिती उपलब्ध होते. सर्वेक्षणाचे प्राथमिक काम (कनिष्ठ सांख्यिकी अधिकारी) आणि सर्वेक्षण गणक (संख्या मित्र) यांच्याद्वारे केले जाईल, तपासणीचे काम एसएसओ (वरिष्ठ सांख्यिकी अधिकारी) आणि सर्वेक्षण पर्यवेक्षक यांच्याद्वारे केले जाणार आहे.

असंघटित क्षेत्रातील उद्योगांचे वार्षिक सर्वेक्षण () : निवडक शहरी विभाग आणि गावांमध्ये आस्थापनांचे सर्वेक्षण. असंघटित क्षेत्रातील उद्योगांचे वार्षिक सर्वेक्षण () हे अर्थव्यवस्थेतील योगदान मोजण्यासाठी भारतातील असंघटित (अनौपचारिक) बिगर कृषी उद्योगांची माहिती संकलित करते. सर्वेक्षणाचे प्राथमिक काम आणि सर्वेक्षण गणक (संख्या मित्र) यांच्याद्वारे केले जाईल, तपासणीचे काम एसएसओ (वरिष्ठ सांख्यिकी अधिकारी) आणि सर्वेक्षण पर्यवेक्षक यांच्याद्वारे जाणार आहे.

किमत संकलन (ग्राहक किंमत निर्देशांक- : शहरी / ग्रामीण / कृषी मजूर / ग्रामीण मजूर) निवडक बाजारपेठांमधील दुकानांमार्फत किमतींचे संकलन केले जाईल : ग्राहक किंमत निर्देशांक () अंतर्गत, गणक एका निश्चित वेळापत्रकानुसार निवडक दुकाने, बाजारपेठा, सेवा प्रदाते आणि संस्थांकडून प्रत्यक्ष किरकोळ किमती गोळा करतात. वस्तूंची यादी आणि वजन हे नवीनतम उपलब्ध घरगुती उपभोग खर्च सर्वेक्षणावर आधारित असतात. सर्वेक्षण गणक (संख्या मित्र) सर्वेक्षणाचे प्राथमिक काम करेल. तपासणीचे काम एसएसओ (वरिष्ठ सांख्यिकी अधिकारी) आणि सर्वेक्षण पर्यवेक्षक यांच्याद्वारे जाणार आहे.

परिस्थिती मूल्यांकन सर्वेक्षण () आणि अखिल भारतीय कर्ज व गुंतवणूक सर्वेक्षण () :
सिच्युएशन असेसमेंट सर्व्हे () भारतामधील शेतकरी कुटुंबांच्या आर्थिक स्थितीबाबत सविस्तर माहिती संकलित करतो. याद्वारे शेतकरी कुटुंबांचे उत्पन्न आणि उपभोग यांचे मूल्यांकन केले जाते. ऑल इंडिया डेट अँड इन्व्हेस्टमेंट सर्व्हे () ग्रामीण आणि शहरी भागातील भारतीय कुटुंबांची मालमत्ता, देयता (कर्ज) आणि गुंतवणुकीचे स्वरूप याबाबत सर्वसमावेशक माहिती पुरवितात. सर्वेक्षणाचे प्राथमिक काम आणि सर्वेक्षण गणक (संख्या मित्र) यांच्याद्वारे केले जाईल; तर तपासणीचे काम *(पान २ वर)*

# दिल्लीतील विद्यार्थ्यांवरील लाठीचार्ज व पेपरफुटी प्रकरणाचा जालना काँग्रेसकडून तीव्र निषेध

## विद्यार्थ्यांवरील कारवाईची उच्चस्तरीय चौकशीची मागणी

**जालना । प्रतिनिधी**

दिल्लीतील जंतर-मंतर येथे आपल्या न्याय्य मागण्यांसाठी शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर करण्यात आलेल्या कथित लाठीचार्जचा तसेच देशभरात चर्चेत असलेल्या पेपरफुटी प्रकरणाचा जालना जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला. या दोन्ही घटनांमुळे देशातील लोकशाही मूल्यांवर आघात झाला असून विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करण्यात आल्याचा आरोप करत काँग्रेसच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत केंद्र शासनाला विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. जिल्हाध्यक्ष कल्याणराव दळे यांच्या मार्गदर्शनाखाली हे आंदोलन व निवेदन सादरीकरण करण्यात आले. यावेळी जालना शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष डॉ. विशाल धानुरे यांच्यासह पक्षाचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**लोकशाही हक्कांवर गदा आल्याचा आरोप**

काँग्रेसने निवेदनात म्हटले आहे की, लोकशाही व्यवस्थेत शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करणे हा प्रत्येक नागरिकाचा घटनात्मक अधिकार आहे. मात्र, दिल्लीतील आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांचा आवाज दडपण्यासाठी पोलिसांकडून बळाचा वापर करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला. अशा प्रकारच्या कारवाईमुळे लोकशाहीची गळचेपी होत असून केंद्र सरकारने विरोधी मतांचा आदर करण्याऐवजी दडपशाहीचे धोरण स्वीकारल्याचा आरोप काँग्रेसने केला.

आंदोलनादरम्यान विरोधी पक्षनेते राहुल गांधी, काँग्रेसच्या नेत्या प्रियंका गांधी आणि समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांना पोलिसांनी ताब्यात घेतल्याचा उल्लेख करत, या



कारवाईलाही काँग्रेसने हुकूमशाही वृत्तीचे उदाहरण असल्याचे म्हटले आहे.

**पेपरफुटीमुळे विद्यार्थ्यांचा विश्वास डळमळीत**

देशभरातील विविध स्पर्धा परीक्षा आणि भरती प्रक्रियांमध्ये झालेल्या कथित पेपरफुटीच्या घटनांमुळे लाखो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक आणि व्यावसायिक भविष्य धोक्यात आले आहे. अनेक वर्षे मेहनत घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये तसेच त्यांच्या पालकांमध्ये परीक्षा व्यवस्थेबाबतचा विश्वास उडाला असून, या प्रकरणामुळे देशातील परीक्षा प्रणालीच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला.

पेपरफुटी प्रकरणाची निष्पक्ष आणि उच्चस्तरीय चौकशी करून दोषींना कठोर शिक्षा देण्यात यावी तसेच या संपूर्ण प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, अशी ठाम मागणी काँग्रेसने केली आहे.

**काँग्रेसच्या प्रमुख मागण्या**

निवेदनात केंद्र शासनाकडे पुढील प्रमुख मागण्या करण्यात *(पान २ वर)*

# मराठवाड्यातील व्यापाऱ्यांची धर्माबादमध्ये महासंग्राम परिषद

## मराठवाडा चेंबर ऑफ ट्रेड अँड कॉमर्सच्या २९ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजन

**जालना - प्रतिनिधी**

मराठवाड्यातील व्यापारी वर्गासमोरील विविध समस्या, कर धोरणे, वीजदर, जीएसटीतील गुंतागुंत आणि व्यापारी हिताच्या प्रश्नांवर सखोल चर्चा करण्यासाठी मराठवाडा चेंबर ऑफ ट्रेड अँड कॉमर्सच्या २९ व्या वर्धापन दिनानिमित्त रविवार, दि. २६ जुलै रोजी सकाळी १० वाजता नांदेड जिल्ह्यातील धर्माबाद येथे भव्य मराठवाडा व्यापार परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. ही परिषद केसरीमलजी करवा प्रेक्षागृह, राजाराम काकाणी सहकार विद्या मंदिर, येळवत रोड, धर्माबाद येथे पार पडणार आहे. या परिषदेचे उद्घाटन महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष रविंद्र मानगावे यांच्या हस्ते होणार असून, अध्यक्षस्थानी मराठवाडा चेंबर ऑफ ट्रेड अँड कॉमर्सचे अध्यक्ष आदेशपालसिंग छाबडा राहणार आहेत. प्रमुख मार्गदर्शक म्हणून गोदावरी अर्बन मल्टीस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या अध्यक्षा राजश्रीताई हेमंत पाटील उपस्थित राहणार आहेत. तसेच महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष सुनील किर्दक आणि सर्वोच्च न्यायालयातील विधिज्ञ ॲड. राहुल हिंगमिरे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

मराठवाडा हा सातत्याने अवर्षणग्रस्त भाग असल्याने येथील व्यापाऱ्यांच्या समस्या राज्यातील इतर भागांपेक्षा वेगळ्या आहेत. या पार्श्वभूमीवर महापालिकांकडून प्रस्तावित आस्थापना कर, महावितरणचा ग्रीड सपोर्टिंग शुल्क, व्यवसाय कर, मार्केट कमिटीचे प्रश्न, जीएसटीतील किचकट अटी, व्यापाऱ्यांसाठी पेन्शन योजना तसेच इतर महत्त्वाच्या विषयांवर सरकारचे लक्ष वेधण्यासाठी या परिषदेत चर्चा होणार आहे. व्यापारी हितासाठी महाराष्ट्र चेंबर आणि मराठवाडा चेंबरच्या माध्यमातून पुढील दिशा निश्चित केली जाणार आहे. परिषदेला महाराष्ट्र चेंबरचे माजी अध्यक्ष मानसिंह पवार, उपाध्यक्ष सत्यनारायण लाहोटी, तनसुख झांबड *(पान २ वर)*

# संपादकीय....

## घोषणांच्या रणधुमाळीत हरवणारे खरे प्रश्न

जालना शहरात भाजप आणि काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये झालेला संघर्ष, घोषणाबाजी, प्रतिआंदोलन आणि त्यानंतरचे प्रतीकात्मक राजकारण यामुळे पुन्हा एकदा स्थानिक राजकीय वातावरण तापले आहे. लोकशाहीत आंदोलन करणे, निषेध व्यक्त करणे आणि सत्ताधारी किंवा विरोधकांवर टीका करणे हा प्रत्येक राजकीय पक्षाचा घटनात्मक अधिकार आहे. मात्र हा अधिकार वापरताना सार्वजनिक शिस्त, संयम आणि लोकहित यांचे भान राखणे तितकेच आवश्यक आहे.

खासदारांच्या कार्यालयासमोर आंदोलन करणे, त्याला प्रत्युत्तर म्हणून प्रतिआंदोलन उभे करणे, घोषणाबाजी, गोमूत्र शिंपडून प्रतीकात्मक निषेध अशा घटनांनी राजकीय संदेश नक्कीच दिला जातो; परंतु अशा कृतींमुळे सामान्य नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांना कितपत न्याय मिळतो, हा प्रश्न अधिक महत्त्वाचा ठरतो. आज देशात बेरोजगारी, शिक्षण, शेतकरी, महागाई, उद्योग, पाणीटंचाई, रस्ते, आरोग्य सेवा आणि स्थानिक विकास यांसारखे अनेक गंभीर विषय नागरिकांसमोर आहेत. जालना जिल्ह्यालाही पाणी, रोजगार, औद्योगिक गुंतवणूक, शहरी सुविधा, वाहतूक कोंडी आणि शेतीशी संबंधित अनेक प्रश्न भेडसावत आहेत. या प्रश्नांवर सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात विधायक चर्चा अपेक्षित असताना राजकारण अनेकदा घोषणांच्या आणि प्रतीकात्मक संघर्षांच्या भोवती फिरताना दिसते. लोकशाहीची खरी ताकद मतभिन्नतेत आहे; वैरभावात नाही. विरोधी पक्षाने सरकारला प्रश्न विचारणे ही लोकशाहीची गरज आहे, तर सत्ताधाऱ्यांनी त्या प्रश्नांना उत्तर देणे ही त्यांची जबाबदारी आहे. त्याचप्रमाणे विरोधकांवर टीका करताना किंवा आंदोलन करताना भाषेचे आणि वर्तनाचे भान राखणे ही सर्वच राजकीय पक्षांची समान जबाबदारी आहे.

या घटनेत पोलिसांनी वेळेवर हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात ठेवली, ही समाधानाची बाब आहे. मात्र भविष्यात अशा संघर्षांमुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही, यासाठी सर्व पक्षांनी आत्मसंयम बाळगणे आवश्यक आहे. राजकारण हे लोकांच्या भावनांना भडकविण्याचे नव्हे, तर त्यांच्या प्रश्नांना उत्तर देण्याचे माध्यम असले पाहिजे. आंदोलने व्हावीत, परंतु ती प्रश्नकेंद्रित असावीत. आरोप-प्रत्यारोप व्हावेत, पण त्यातून तथ्ये आणि उत्तरदायित्व समोर यायला हवे. लोकशाहीचा स्तर घोषणांच्या आवाजाने नव्हे, तर जनतेच्या जीवनात घडणाऱ्या सकारात्मक बदलांनी मोजला जातो. जालन्यातील अलीकडील घटना ही केवळ दोन पक्षांतील संघर्ष म्हणून पाहण्यापेक्षा आपल्या राजकीय संस्कृतीचे प्रतिबिंब म्हणून पाहण्याची गरज आहे. निवडणुका येतील-जातील, सत्तांतरही होईल; परंतु नागरिकांचे प्रश्न कायम राहतात. त्यामुळे राजकीय पक्षांनी संघर्षापेक्षा संवादाला, प्रतीकात्मक आंदोलनांपेक्षा विकासाच्या स्पर्धेला आणि घोषणांपेक्षा जनहिताच्या कामांना अधिक प्राधान्य दिले, तर त्याचाच सर्वाधिक फायदा लोकशाहीला आणि समाजाला होईल.

# सच्चे रंगकर्मी स्वर्गीय जयंत सावरकर!

मराठी रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते स्वर्गीय जयंत सावरकर यांच्या आज तिसऱ्या स्मृतिदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

२४ जुलै २०२३ रोजी वयाच्या ८७व्या वर्षी वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या जाण्याने मराठी रंगभूमीने अभिनयाची उपासना करणारा, कलेशी अखंड निष्ठा राखणारा आणि रंगभूमीला आयुष्य अर्पण करणारा एक सच्चा रंगकर्मी गमावला.

३ मे १९३६ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर तालुक्यात जन्मलेल्या जयंत सावरकरांनी उपजीविकेसाठी मुंबई गाठली. काही काळ त्यांनी नोकरी केली; मात्र अभिनयाची ओढ त्यांना स्वस्थ बसू देईना. अखेर त्यांनी नोकरीचा सुरक्षित मार्ग सोडून रंगभूमीचा खडतर प्रवास स्वीकारला. त्यांच्या या निर्णयाला सुरुवातीला कुटुंबातून विरोध झाला, तरीही त्यांनी आपल्या ध्येयाशी तडजोड केली नाही.

कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळात त्यांनी बॅकस्टेज कलाकार म्हणूनही काम केले. मात्र संयम, जिद्द आणि स्वतःच्या कर्तृत्वावर असलेला विश्वास यामुळे त्यांना अभिनयाच्या संधी मिळू लागल्या. भूमिका मोठी की छोटी, यापेक्षा ती किती परिणामकारक आहे, यालाच त्यांनी महत्त्व दिले. त्यामुळे अगदी छोट्या भूमिकांमधूनही त्यांनी आपल्या अभिनयाची वेगळी छाप उमटवली आणि अल्पावधीतच मराठी रंगभूमीवरील एक प्रभावी अभिनेता म्हणून ओळख निर्माण केली.

पुढे त्यांनी अनेक नाटकांत प्रमुख भूमिका साकारल्या. एकच प्याला मधील तळीराम, तुझे आहे तुजपाशी मधील आचार्य, व्यक्ती आणि वल्ली मधील अंतू बर्वा आणि हरितात्या या भूमिका आजही रसिकांच्या स्मरणात आहेत. सौजन्याची ऐसी तैशी, टिळकआगरकर, ययातीदेवयानी आणि सूर्यास्त यांसारख्या नाटकांमधील त्यांचा अभिनय विशेष गाजला.

मामा पेंडसे, केशवराव दाते, दत्ताराम यांच्यापासून ते चंद्रकांत कुलकर्णी आणि मंगेश कदम यांसारख्या विविध पिढ्यांतील दिग्दर्शकांसोबत त्यांनी काम केले. शंभरहून अधिक नाटकांबरोबरच तीसहून अधिक मराठी व हिंदी चित्रपट आणि अनेक दूरचित्रवाणी मालिकांमधूनही त्यांनी आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला. तरीही त्यांची खरी ओळख रंगभूमीवरील सिद्धहस्त कलाकार अशीच राहिली. जयंत सावरकर यांच्या अभिनयात कृत्रिमता नव्हती. सहज, नैसर्गिक आणि जीवनाशी जोडलेला अभिनय हे त्यांचे वैशिष्ट्य होते. त्यामुळे रंगमंचावरची त्यांची प्रत्येक व्यक्तिरेखा प्रेक्षकांना आपल्या घरातील एखाद्या माणसासारखी वाटायची. अभिनयातील ही सहजता आणि प्रामाणिकपणाच त्यांच्या लोकप्रियतेचे खरे रहस्य होते.त्यांच्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत त्यांना अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी गौरविण्यात आले. अखिल भारतीय नाट्य परिषदेचा जीवनगौरव पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. तसेच १९९७ मध्ये भरलेल्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषवले.

''एक छोटा माणूस'' हे त्यांचे आत्मचरित्र त्यांच्या कलाप्रवासाचे प्रेरणादायी दस्तऐवज आहे. आज त्यांच्या तिसऱ्या स्मृतिदिनी त्यांची आठवण काढताना जाणवते की, कलाकाराचे शरीर काळाच्या पडद्याआड जाते; परंतु त्याची कला आणि त्याने साकारलेल्या भूमिका कायम जिवंत राहतात. जयंत सावरकर यांनी आपल्या अभिनयातून मराठी रंगभूमीला समृद्ध केले आणि असंख्य कलाकारांना प्रेरणा दिली. त्यांचे योगदान मराठी नाट्यविश्व कधीही विसरणार नाही. ज्येष्ठ रंगकर्मी स्वर्गीय जयंत सावरकर यांना तिसऱ्या स्मृतिदिनी भावपूर्ण विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
**दौंड, जिल्हा पुणे**

# केदारखेडा येथे अवैध वाळू उपशावरून शेतकऱ्याला मारहाण झाल्याचा आरोप; जेसीबी अंगावर घालण्याचा प्रयत्न

**जालना | प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यातील केदारखेडा येथील पूर्णा नदीपात्रात सुरू असलेल्या कथित अवैध वाळू उपशाच्या वादातून एका शेतकऱ्याला मारहाण करून जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. या घटनेत संबंधित शेतकऱ्याच्या अंगावर जेसीबी घालण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचाही दावा करण्यात आला आहे. विशेष म्हणजे ही घटना महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांसमोर घडल्याचा आरोप करण्यात आल्याने प्रकरण अधिक गंभीर बनले आहे. या प्रकरणी शेतकरी कृष्णा जाधव यांनी भोकरदन पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून पोलिसांनी अदखलपात्र गुन्ह्याची नोंद केली आहे. मात्र, इतक्या गंभीर स्वरूपाच्या आरोपांनंतरही केवळ अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आल्याबद्दल शेतकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. तक्रारीनुसार, केदारखेडा परिसरातील पूर्णा नदीपात्रात शेतकरी कृष्णा जाधव यांच्या शेतालगत व त्यांच्या मालकीच्या विहिरीजवळ मोठ्या प्रमाणात वाळू उपसा सुरू होता. या उत्खननामुळे विहिरीच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होत असल्याचा आरोप करत त्यांनी संबंधितांना जाब विचारण्यासाठी घटनास्थळी धाव घेतली. त्यावेळी वाळू वाहतूक करणाऱ्या काही व्यक्तींनी त्यांच्याशी वाद घालत शिवीगाळ केली, हॉकी स्टिकने मारहाण केली तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप जाधव यांनी केला आहे. शेतकरी कृष्णा जाधव यांनी आणखी गंभीर आरोप करत सांगितले की, वाद सुरू असताना त्यांच्या अंगावर जेसीबी घालण्याचाही प्रयत्न करण्यात आला. या संपूर्ण प्रकारामुळे त्यांच्या जीवाला धोका निर्माण झाल्याचा दावा त्यांनी केला आहे. घटना घडत असताना तहसीलदार आणि तलाठी घटनास्थळी उपस्थित असल्याचा दावा तक्रारदाराने केला असून, त्यांच्या समोरच हा प्रकार घडल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या घटनेशी संबंधित असल्याचा दावा करण्यात येणारा एक व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला आहे. व्हिडिओमध्ये काही व्यक्तींमध्ये वाद आणि धक्काबुक्की होत असल्याचे दिसत असल्याची चर्चा आहे. मात्र, या व्हिडिओची स्वतंत्र अधिकृत पुष्टी झालेली नाही.

**पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह**

शेतकरी कृष्णा जाधव यांनी दिलेल्या तक्रारीनंतर भोकरदन पोलिसांनी अदखलपात्र गुन्हा दाखल केला आहे. मात्र, जीवे मारण्याची धमकी, मारहाण आणि जेसीबी अंगावर घालण्याचा प्रयत्न अशा गंभीर आरोपांनंतरही अधिक गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल न केल्याबद्दल त्यांनी पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. या प्रकरणातील संबंधित वाळू माफियांविरुद्ध कठोर कारवाई करून गुन्हा दाखल करावा, तसेच अवैध वाळू उपसा तात्काळ थांबवावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

**महसूल प्रशासनाची भूमिकेकडे लक्ष**

या घटनेत महसूल विभागाचे अधिकारी उपस्थित असल्याचा आरोप झाल्यामुळे प्रशासनाच्या भूमिकेकडेही लक्ष लागले आहे. नदीपात्रातील कथित अवैध वाळू उपशाबाबत महसूल विभाग आणि पोलिस प्रशासन नेमकी काय भूमिका घेते, तसेच या प्रकरणात पुढे कोणती कारवाई होते, याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

पान १ व ४ वरुन...

## जालन्यात २.०५...

कालावधीत घेतलेले अल्पमुदतीचे पीक कर्ज, ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत असलेली कर्जे आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत न भरलेली कर्जे या योजनेसाठी पात्र ठरविण्यात आली होती.

यानंतर शासनाने आधार प्रमाणीकरण, ॲग्रीस्टॅक ( ), ई-केवायसी आणि डिजिटल पडताळणी अनिवार्य करून योजनेत अधिक पारदर्शकता आणली. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांच्या अटींमध्येही शिथिलता देण्यात आली असून त्यामुळे आणखी २३ लाख शेतकऱ्यांना लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असल्याचे त्यांनी सांगितले.

**जालना जिल्ह्यात २.०५ लाख शेतकऱ्यांना ₹२,१९१ कोटी**

या योजनेचा जालना जिल्ह्यालाही मोठा फायदा होणार असल्याचे सांगताना लोणीकर म्हणाले की, जिल्ह्यातील २ लाख ५ हजार १६२ शेतकऱ्यांना ₹२,१९१ कोटींच्या कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य मिळून शेतीत नव्याने गुंतवणूक करण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पहिल्या कार्यकाळात छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना-२०१७ अंतर्गत ₹३४,०२२ कोटींची कर्जमाफी जाहीर करण्यात आली होती.

या योजनेचा लाभ ४४ लाख ४ हजार शेतकऱ्यांना झाला. त्याचबरोबर नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ₹२,४२७ कोटींचे प्रोत्साहनपर अनुदान देण्यात आले. ३० जून २०१६ पर्यंतची थकीत कृषी कर्जे, ₹१.५० लाखांपर्यंतचे पीक कर्ज आणि सुविधेमुळे ही योजना राज्यातील सर्वात मोठ्या कर्जमाफी योजनांपैकी एक ठरल्याचे त्यांनी सांगितले.

**४८ हजार कोटींची वीजबिल माफी**

शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने ₹४८ हजार कोटींच्या कृषी पंप वीजबिल थकबाकी माफीची घोषणा केली आहे. या निर्णयाचा लाभ ३० लाख कृषी पंपधारक शेतकऱ्यांना मिळणार असल्याचे लोणीकर यांनी सांगितले. तसेच मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना-२०२४ अंतर्गत ४७ लाख ४१ हजार कृषी पंपधारकांना साडेसात अश्वशक्तीपर्यंतच्या कृषी पंपासाठी मोफत वीज उपलब्ध करून देण्यात आली आहे. यासाठी २०२४-२५ या आर्थिक वर्षात ₹११,१८५ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. जालना जिल्ह्यात १ लाख ३८ हजार ४६४ शेतकऱ्यांना ₹२,४९५.५४ कोटींच्या वीजबिल माफीचा लाभ मिळणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

**सौर कृषी पंपांत महाराष्ट्राची विक्रमी कामगिरी**

राज्य शासनाने मागेल त्याला सौर कृषी पंप योजना प्रभावीपणे राबविली असून राज्यात आतापर्यंत ६ लाख ६३ हजार ३२४ सौर कृषी पंप बसविण्यात आले आहेत. विशेष म्हणजे, अवघ्या ३० दिवसांत ४५ हजार ९११ सौर कृषी पंप बसवून महाराष्ट्राने गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये स्थान मिळविले असल्याचा दावा लोणीकर यांनी केला. पुढील पाच वर्षांत राज्यात १० लाख सौर कृषी पंप बसविण्याचे उद्दिष्ट शासनाने निश्चित केले आहे.

**कृषी विकास योजनांनाही मोठा निधी**

राज्य शासनाने नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, प्रधानमंत्री पीक विमा योजना, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना आणि जलयुक्त शिवार अभियान यांसारख्या योजनांनाही मोठा निधी उपलब्ध करून दिला असून कृषी क्षेत्राचा दीर्घकालीन विकास साधण्यावर भर दिला जात असल्याचे लोणीकर यांनी सांगितले. पत्रकार परिषदेच्या शेवटी बोलताना त्यांनी सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी कल्याणाला केंद्रस्थानी ठेवून राबविण्यात आलेल्या विविध योजनांमुळे राज्यातील लाखो शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा, स्थैर्य आणि विकासाची नवी संधी मिळाली आहे. कर्जमाफी, वीजबिल माफी, मोफत वीज, सौर कृषी पंप, सिंचन आणि कृषी विकास योजनांच्या माध्यमातून राज्य शासनाने शेतकरी हिताचा सर्वसमावेशक दृष्टिकोन स्वीकारल्याचा दावा त्यांनी यावेळी केला.

## श्री क्षेत्र विठ्ठल माळावर...

ममदाबाद, बापकळ, रामनगर, हडप सावरगाव, सिंधी, काळेगाव, कचरेवाडी, मौजपुरी, उटवद, धांडेगाव, डुकरी पिंपरी, खोडेपुरी, घोडेगाव, सोलगव्हाण, सोमनाथ जळगाव, पिरकल्याण यांसह जालना शहर आणि विविध वस्त्या-तांड्यांमधून वारकरी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक तसेच लहान मुलांचा उत्स्फूर्त सहभाग या सोहळ्याला अधिक रंगतदार बनवणार आहे. ''ज्ञानोबा-तुकाराम'' आणि ''पांडुरंग हरी''च्या अखंड जयघोषाने संपूर्ण हिवरा तपेश्वर परिसर भक्तिरसात न्हाऊन निघणार आहे.२५ जुलै रोजी दिवसभर धार्मिक कार्यक्रमशनिवार, २५ जुलै रोजी आषाढी एकादशीनिमित्त पहाटे काकड आरतीने कार्यक्रमांना सुरुवात होईल. त्यानंतर विठ्ठल-रुक्मिणीचा महाअभिषेक, महापूजा, नामस्मरण, हरिपाठ, भजन, कीर्तन, प्रवचन तसेच दिंडींचे आगमन आणि दर्शनाचा कार्यक्रम दिवसभर सुरू राहणार आहे. दिवसभर भाविकांची दर्शनासाठी मोठी गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेऊन नियोजन करण्यात आले आहे.भाविकांसाठी विविध सुविधाभाविकांची गैरसोय होऊ नये म्हणून मंदिर समितीने परिसरात तात्पुरते शेड उभारले असून पिण्याच्या शुद्ध पाण्याची, फराळाची तसेच इतर आवश्यक सुविधांची व्यवस्था केली आहे. दर्शनासाठी येणाऱ्या वारकऱ्यांना कोणताही त्रास होऊ नये, यासाठी स्वयंसेवकांचीही नियुक्ती करण्यात आली आहे.चोख पोलिस बंदोबस्तसोहळ्याला मोठ्या प्रमाणावर गर्दी होणार असल्याने मौजपुरी पोलिस ठाण्याच्या वतीने कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी विशेष पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. वाहतूक नियंत्रणासह गर्दीचे नियोजन करण्यासाठी पोलिस आणि मंदिर समिती समन्वयाने काम करणार आहेत.श्रद्धा, भक्ती आणि वारकरी परंपरेचा संगमआषाढी एकादशी हा वारकरी संप्रदायासाठी अत्यंत पवित्र दिवस मानला जातो. श्री क्षेत्र विठ्ठल माळावर होणारा हा सोहळा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून वारकरी परंपरा, सामूहिक भक्ती आणि सामाजिक एकतेचे दर्शन घडवणारा उत्सव आहे. यंदाही हजारो वारकरी विठुरायाच्या चरणी नतमस्तक होऊन सुख-समृद्धीची प्रार्थना करणार असून हिवरा तपेश्वर परिसर हरिनामाच्या गजराने दुमदुमून जाणार आहे.चौकट रस्त्याची अवस्था भाविकांसाठी डोकेदुखीदरवर्षी हजारो भाविक या पवित्र स्थळी येत असले, तरी मंदिरापर्यंत पोहोचण्यासाठी अद्यापही पक्का रस्ता उपलब्ध नाही. गावापासून सुमारे ५ ते ६ किलोमीटर अंतरावरील या मंदिराकडे जाणारा मार्ग खडतर असून पावसाळ्यात तो अधिकच चिखलमय होतो. त्यामुळे वारकरी आणि ज्येष्ठ नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो.स्थानिक ग्रामस्थ आणि वारकरी अनेक वर्षांपासून मंदिरापर्यंत पक्का रस्ता तयार करण्याची मागणी करत आहेत. धार्मिक पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्व असलेल्या या क्षेत्राचा विकास झाल्यास भाविकांची संख्या वाढण्यासह स्थानिक भागालाही मोठा फायदा होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## महापौरांना नगरसेवकाला..

यावेळी त्यांनी महापौरांनी दिलेली नोटीस पत्रकार परिषदेतच फाडून केराच्या टोपलीत टाकत निषेध नोंदविला. महापौरांना नगरसेवकाला अशा प्रकारे नोटीस बजावण्याचा कोणताही कायदेशीर अधिकार नसल्याने ही नोटीस बेकायदेशीर असल्याचा आरोप त्यांनी केला.

''मला मानसिक त्रास देण्यासाठी आणि अपक्ष नगरसेवक असल्यामुळे राजकीय दबाव आणण्यासाठी ही नोटीस देण्यात आली आहे. माझा महापौरांसोबत कोणताही वैयक्तिक वाद नाही. मात्र, विरोधी आवाज दाबण्याचा प्रयत्न केला जात आहे,'' असा आरोप पांगारकर यांनी केला.

लोकशाही व्यवस्थेत विरोधी पक्षाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. मात्र, जालना महानगरपालिकेत विरोधी पक्षाचा आवाज दाबण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

महानगरपालिका शहराच्या स्वच्छतेबाबत गंभीर नसल्याची टीका करताना पांगारकर म्हणाले, ''मनपा कार्यालयातच स्वच्छतेचा अभाव आहे, तर शहराची स्वच्छता कशी राहणार?'' असा टोला त्यांनी लगावला. महापौरांनी बजावलेल्या नोटीसला आपण कायदेशीर आणि घटनात्मक पद्धतीने उत्तर देणार असून आवश्यक असल्यास महापौरांनाही कायदेशीर नोटीस बजावली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला. या पत्रकार परिषदेनंतर जालना महानगरपालिकेतील महापौर आणि अपक्ष नगरसेवक यांच्यातील वाद अधिक तीव्र होण्याची चिन्हे दिसत असून, या प्रकरणाकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

## देशाच्या विकासासाठी...

आणि सर्वेक्षण पर्यवेक्षक यांच्याद्वारे केले जाईल.

स्थलांतर तपशील सर्वेक्षण () - निवडक शहरी विभाग आणि गावांमध्ये सर्वेक्षण :

स्थलांतर तपशील सर्वेक्षण () हे भारतातील कुटुंबे आणि व्यक्तींच्या स्थलांतराच्या पद्धतींबाबत सविस्तर माहिती गोळा करण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आले आहे, जेणेकरून पुराव्यांवर आधारित धोरणनिर्मितीस मदत होईल. सर्वेक्षणाचे प्राथमिक काम आणि सर्वेक्षण गणक (संख्या मित्र) यांच्याद्वारे केले जाईल,तर तपासणीचे काम आणि सर्वेक्षण पर्यवेक्षक यांच्याद्वारे केले जाईल. निवडक शहरी विभाग आणि गावांमध्ये राष्ट्रीय कौटुंबिक उत्पन्न सर्वेक्षण :

राष्ट्रीय कौटुंबिक उत्पन्न सर्वेक्षण () चा उद्देश देशभरातील कौटुंबिक उत्पन्न आणि उत्पन्नाच्या

वितरणाबाबत विश्वसनीय अंदाज तयार करणे हा आहे, ज्यामुळे भारतातील अधिकृत आकडेवारीतील दीर्घकाळापासून असलेली उणीव भरून काढली जाईल. सर्वेक्षणाचे प्राथमिक काम आणि सर्वेक्षण गणक (संख्या मित्र) यांच्याद्वारे जाणार आहे. तर तपासणीचे काम आणि सर्वेक्षण पर्यवेक्षक यांच्याद्वारे जाणार आहे. निवडक संस्थांमधील निगमित सेवा क्षेत्रातील उद्योगांचे वार्षिक सर्वेक्षण () :

नोंदणीकृत सेवा क्षेत्रातील उपक्रमांचे वार्षिक सर्वेक्षण () हे नोंदणीकृत सेवा क्षेत्राला समर्पित असलेले भारतातील पहिले वार्षिक सर्वेक्षण आहे. कॉर्पोरेट सेवा-क्षेत्रातील उपक्रमांवर एक व्यापक डेटाबेस विकसित करण्यासाठी हे राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाद्वारे () आयोजित केले जाते. डेटा संकलनाचे प्राथमिक काम / करणार आहेत. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयामार्फत राबविण्यात येणारी ही सर्वेक्षणे देशाच्या सामाजिक आणि आर्थिक प्रगतीचा वस्तुनिष्ठ आढावा देणारी आहेत. या सर्वेक्षणांतून मिळणारी विश्वासार्ह आकडेवारी शासनाला लोकाभिमुख योजना तयार करण्यासाठी, विकासाला चालना देण्यासाठी आणि विविध क्षेत्रांतील अचूक धोरणनिर्मितीसाठी महत्त्वपूर्ण आधार ठरणार आहे. त्यामुळे संबंधित नागरिकांनी सर्वेक्षण कर्मचाऱ्यांना योग्य व अचूक माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## मराठवाड्यातील...

प्रफुल्ल मलानी, तसेच मराठवाडा चेंबरचे माजी अध्यक्ष कल्याण बरकसे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी नांदेड अडतिया असोसिएशनचे अध्यक्ष सुबोध काकाणी आणि त्यांची संपूर्ण टीम परिश्रम घेत आहे. परिषदेत व्यापार, उद्योग आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यापाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात येणार आहे. मराठवाडा चेंबरचे महासचिव श्याम लोया, जालना व्यापारी महासंघाचे अध्यक्ष विनीत सहानी, महासचिव संजयजी दाड, राजेश राऊत, इंदरसेट तवरावाला, कोषाध्यक्ष विजय राठी, कार्याध्यक्ष सुभाष देविदान, अर्जुन गेही, बंकटलाल खंडेलवाल, दिलीपभाई शहा तसेच व्यापारी महासंघाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी मराठवाड्यातील व्यापारी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून व्यापारी वर्गाची एकजूट आणि ताकद शासनासमोर प्रभावीपणे मांडावी, असे आवाहन केले आहे.

## दिल्लीतील विद्यार्थ्यांवरील...

आल्या आहेत. दिल्लीतील विद्यार्थ्यांवरील लाठीचार्जची उच्चस्तरीय व निष्पक्ष चौकशी करण्यात यावी.

पेपरफुटी प्रकरणाची संपूर्ण चौकशी करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी.

नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी तातडीने राजीनामा द्यावा.

आंदोलक विद्यार्थी व कार्यकर्त्यांवर दाखल करण्यात आलेले कथित खोटे गुन्हे मागे घ्यावेत.

लाठीचार्जमध्ये जखमी झालेल्या विद्यार्थ्यांना तात्काळ मोफत वैद्यकीय उपचार व आर्थिक मदत द्यावी.

देशातील सर्व स्पर्धा परीक्षा पारदर्शक, सुरक्षित आणि विश्वासार्ह पद्धतीने घेण्यासाठी सक्षम यंत्रणा उभारावी. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी तडजोड मान्य नाही

काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांकडे दुर्लक्ष करून त्यांच्यावर बळाचा वापर करणे आणि दुसरीकडे वारंवार समोर येणाऱ्या पेपरफुटीच्या घटनांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यात अपयश येणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. देशातील युवकांच्या भविष्याशी कोणत्याही प्रकारची तडजोड सहन केली जाणार नसून, विद्यार्थ्यांना न्याय मिळेपर्यंत काँग्रेसचा संघर्ष सुरू राहील, असा इशाराही यावेळी देण्यात आला. मोठ्या संख्येने पदाधिकारी उपस्थित

या निवेदन सादरीकरणावेळी शहर जिल्हाध्यक्ष डॉ. विशाल धानुरे, संजय मुथा, सुभाष कोळकर, एकबाल कुरेशी, राजाभाऊ कुलकर्णी, संजय इंगळे, जुमान चाऊस, चंद्रकांत रत्नपारखे, ज्ञानेश्वर भांदरगे, शेख शमशुद्दीन, जावेद भाई, कृष्णा पडूळ, रघुवीर गुडे, गंगाधर कवठे, कल्याण तारडे, श्रीरंग कामठे, नंदा मित्तल, सुनील चौधरी, दायमाजी, करीम बिल्डर, ॲड. गव्हाणे, शेख वसीम, शेख शकील, ज्ञानेश्वर डुकरे, आरिफ खान, कलीम खान, सुरज यलगंटवार यांच्यासह काँग्रेसचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. केंद्र सरकारने विद्यार्थ्यांच्या प्रश्नांबाबत संवेदनशील भूमिका घेत तातडीने योग्य निर्णय घ्यावेत, अन्यथा देशभरात जनआंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही काँग्रेसच्या वतीने यावेळी देण्यात आला.

## जालन्यात २ ऑगस्टपासून...

आणि भगवान महावीर निर्वाण महोत्सव यांसारखे विविध धार्मिक कार्यक्रम उत्साहात साजरे केले जाणार आहेत. यासोबतच

यावर्षीच्या चातुर्मासाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे सामूहिक सहयोग, सामूहिक सहभाग आणि सामूहिक धर्मलाभ हे आहे. धर्मकार्य कोणत्याही एका व्यक्तीच्या सहयोगातून नाही, तर संपूर्ण समाजाच्या सामूहिक श्रद्धा, सहभाग आणि समर्पणातून भव्य व यशस्वी बनते, हा विचार घेऊन हा सोहळा आयोजित करण्यात आला आहे. सकल जैन समाजाच्यावतीने आयोजित या चातुर्मासासाठी विविध समित्यांची स्थापना करण्यात आली असून, बाहेरून येणाऱ्या पाहुण्यांच्या निवास आणि भोजनाची उत्तम व्यवस्था करण्यात आली आहे. या पवित्र धर्मगंगेत आपल्या कुटुंबीयांसह सहभागी होऊन लाभ घ्यावा, असे आवाहन पार्श्व पवित्र सेवा समिती व श्री १००८ चिंतामणी पार्श्वनाथ अग्रवाल दिगंबर जैन मंदिरच्यावतीने करण्यात आले आहे.

## महात्मा जोतीराव...

पशुवैद्यकीय दवाखान्यांमध्ये पुरवण्यात आलेल्या औषधांमधून हे उपक्रम राबवले जाणार असून, सर्व प्रादेशिक कार्यालयांना या उपक्रमांचा मासिक अहवाल सादर करण्याचे निर्देश पशुसंवर्धन विभागाने दिले आहेत.

या उपक्रमांमुळे राज्यातील पशुपालकांना मोठा दिलासा मिळणार असून पशुधनाची उत्पादकता वाढण्यास मदत होणार आहे. महान समाजसुधारक महात्मा जोतीराव फुले यांच्या द्विजन्मशताब्दी वर्षानिमित्त पशुसंवर्धन विभागाच्या वतीने राज्यभरात विशेष उपक्रम राबवले जात आहेत. ग्रामीण भागातील पशुपालकांचे उत्पन्न वाढवणे, जनावरांचे आरोग्य सुधारणे व दुग्धव्यवसाय अधिक फायदेशीर करणे, हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. जंतनिर्मूलन, वंध्यत्व निवारण व तांत्रिक मार्गदर्शनाच्या माध्यमातून राज्यातील प्रत्येक गावातील पशुधनापर्यंत पोहोचण्यास आम्ही कटीबद्ध आहोत. राज्यातील सर्व पशुपालकांनी या शिबिरांचा व उपक्रमांचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन पशुसंवर्धन आयुक्त,डॉ. किरण पाटील यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

## मुख्यमंत्र्यांच्या...

भांदरगे आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत आज जालना शहरातील रूपम हॉल मध्ये भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात पाणी पुरवठा सभापती सौ.पूनम स्वामी,राज स्वामी, नगरसेवक रमेश गौरक्षक,नगरसेविका सौ.वर्षाताई राऊत यांच्यासह ७५ दात्यांनी रक्तदान केले.यावेळी युवा नेते व नगरसेवक अक्षय गोरंट्याल, नग.

## ट्रकची विद्युत...

करावी असेही त्या सुज्ञ नागरिकांनी आमच्या वृत्त प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

हा विषय राजकारणाचा नसून थेट जनतेच्या जीवाशी संबंधित आहे. आज ट्रक धडकला आहे, उद्या एखादी बस धडकू शकते. लोकहितासाठी तालुक्यातील सर्वपक्षीय नेत्यांनी एकत्र येऊन ही धोकादायक लाईन दुसऱ्या सुरक्षित मार्गाने हलवण्यासाठी सहकार्य करन्याची अपेक्षा संतोष औटी यांनी व्यक्त केली.

# एक तरी वारी आचरावी..!!

...चंद्रभागेच्या तिरावर पंढरपूर येथील विठ्ठल-रखुमाईच्या दर्शनासाठी अफाट जनसागर (वारकरी, गरीब-श्रीमंत, आंधळे-पांगळे, सर्व जाती-धर्माचे) आषाढी एकादशी दिवशी टाळ-मृदुंगाच्या गजरात विठूचा गजर हरीनामाचा झेंडा रोविला... असे म्हणत पंढरपूरमय होतो. महाराष्ट्रात मध्ययुगामध्ये अनेक भक्तिसंप्रदाय उदयास आले आणि कमी-अधिक काळ आपला प्रभाव गाजवून क्षीण झाले किवा नामशेष झाले, मात्र महाराष्ट्रातील वारकरी संप्रदाय याला अपवाद ठरला आहे. या संप्रदायाचा प्रभाव सतत वाढतच राहिलेला आहे. अगदी १९व्या, २० व्या आणि २१ व्या विज्ञाननिष्ठ शतकामध्येही हा संप्रदाय टिकून आहे. एवढेच नव्हे तर तो समाजशास्त्र आणि साहित्य संशोधक यांच्या कुतूहलाचा विषय होऊन राहिला आहे.

पंढरपूरची वारी हा प्रकार महाराष्ट्रातील वारकरी भक्तिसंप्रदायाला इतर भक्तिसंप्रदायांपासून खास रितीने वेगळा ठरविणारा आहे. काही तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्धीला आलेल्या किंवा पुराणकाळापासून माहात्म्य लाभलेल्या काशी, जगन्नाथपुरी, बद्रिकेश्वर, बालाजी तिरुपती, रामतीर्थ इत्यादी तीर्थक्षेत्रासारखे पढरपूर हे क्षेत्र नाही. पंढरपूरची वारी हा तीर्थक्षेत्रापेक्षा वेगळा प्रकार आहे. पंढरपूरची वारी करणे म्हणजे, तीर्थयात्रेचे पुण्य गाठीस बांधणे अशी काही भावना कोणताही वारकरी बाळगून नसतो. दुसरी आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे,इतर


ह.भ.प.कै.जनाबाई शिवाप्पा संकपाळ.

तीर्थक्षेत्रांना यात्रा महणून जाऊन येण्याचा दबाज (पद्धत) असचा व्याक भनेचा दैनंदिन जीवनाशी अतूट संबंध असतोच असे नाही. उलटपक्षी तो तगा नसतो असे म्हणता येईल; परंतु पढरपूरची वारी करणाऱ्या माणसांचे जीवन अगदी बदलून जावे अशी अपेक्षा असते. मुख्य म्हणजे आपण वारकरी असून वारकऱ्याचे व्रतस्थ जीवन जगत आहोत याची निदर्शने करणाऱ्या तुळशीमाळा, त्रिपुंडा किंवा खांद्यावर भगवी पताका व तो टाळ-मृदुंगाचा आवाज यासारख्या खाणाखुणा त्याने निश्चयाने बाळगाव्यात अशीही अपेक्षा असते एवढेच नव्हे तर त्याने भगवद्भक्ती करावी, कोणत्या यंत्राचे आणि ग्रंथाचे पंठण करावे यासंबंधानेही काही आदेश असतात. खरा वारकरी या आदेशांचे जास्तीत जास्त पालन करण्यात धन्यता मानतो. अन्य पंथांमध्ये दाखल



होणाऱ्या भक्तांवर अशाच प्रकारच्या आदेशांचे निबंध असले, तरी त्या निबंधांना कर्मकांडाचे स्वरूप आलेले असते. वारकरी पंथामध्ये कर्मकांडाचा मुळागत निर्बंध केलेला आहे.

महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाचे अन्य भक्तिसंप्रदायांपेक्षा असलेले वेगळेपण अनेक प्रकारे सांगता येईल. येथे फक्त एका महत्त्वाच्या गोष्टीचा निर्देश करायचा आहे, तो म्हणजे वारकऱ्यांचे कुलदैवत कुठलेही असो, वारकरी होताच पंढरपूरच्या विठ्ठलाचा भक्त होऊन जाता, यातही पुन्हा वैशिष्ट्य असे पंढरपूरच्या विठ्ठलाची भक्ती स्वीकारल्यावर अन्य देवतांच्या भक्तीचा त्याने त्याग करावयास पाहिजे असे बंधन त्याच्यावर नसते. त्यातूनच मग तो ईश्वराकडे (परमेश्वर) एकत्वबुद्धीने पाहण्यास शिकतो, म्हणूनच महासमन्वय ही संस्कृती घेऊन उभा राहिलेला वारकरी पंथ महाराष्ट्रात नुकताच लोकप्रिय झाला असे नव्हे, तर शतकानुशतके खंबीरपणे पाय रोवून स्थिरावला आहे. ज्ञानदेव, नामदेवाच्या काळी महाराष्ट्रावर असलेल्या अस्मानी-सुलतानी आपत्तीमध्ये जनतेचा धीर

आधुनिक खचू न देता त्यांची मने समर्थ बनविण्याचे काम या थोर संतांच्या भागवत धर्माने केले, ज्ञान, ऐश्वर्य, शक्ती, बळ, वीर्य, तेज या सहा गुणांनी संपन्न असणाऱ्या भगवंताचा धर्म शक्तिगर्भआहे. यातून स्वराज्य प्राप्त होते, रक्तहिन सामाजिक क्रांतीची विचारधारा निर्माण करण्याची ताकद या विचारसूत्रीत असली, तरी या गोष्टीस दुबळेपणा-भेकडपणाचे स्वरूप नसावे, म्हणून संत तुकाराम म्हणतात, तरी भले देऊ कासेची लंगोटी। नाठाळाच्या माथी हाणु काठी। वारकरी संघाच्या विचारांत जातिभेद, विषमता, अज्ञान, अंधश्रद्धा यांचा विचार होताना विठ्ठल उपासना आणि पंढरपूर वारीचे पडसाद उमटतात. ईश्वरप्राप्तीसाठी संसार न सोडता संसारात राहूनदेखील पारमार्थिक आनंद मिळवता येतो हे वारीतून दिसून येते. जीवनाचे ध्येय भक्ती हेच मानले आहे. मनामनातील मशागत, करणारा वारकरी संप्रदाय जीवन अंतर्बाहा बदलून टाकतो, शुद्धाचरण सात्विक आहाराबरोबर चांगल्या विचारातून परस्पर द्वेष, मद, क्रोध, त्वेष यांसारख्या गोष्टींपासून दूर राहण्याची शिकवण जणू वारी-वारकरी आचारात मिळते, यालाच आध्यात्मिक अभ्यास म्हटला जातो. वारीला सुरुवात केली की, वर्षानुवर्षे पायी वारी करून वारकरी विठ्ठलमय होतात, वारीची परंपरा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जाते. कोल्हापूरच्या गडहिंग्लज तालुक्यातील जखेवाडी गावच्या ह.भ.प के. जनाबाई शिवाप्पा संकपाळ यांनी आयुष्यात ३६ पायी वाऱ्या केल्या. १०५ व्या वर्षी माऊलीचे निधन झाले. त्यांची शेवटची इच्छा अशी होती की माझी अस्ति पंढरपूरच्या चंद्रभागेत करावी त्यांचे नातू.. देवदास संकपाळ यांनी अस्तितचंद्र पंढरपूरला घेऊन जाऊन विसर्जन करून आपल्या आजीची शेवटची मनोकामना पुरी केली. त्यानंतर त्याच्या मोठ्या सूनबाई इंदुबाई मारुती संकपाळ तसेच त्यांचे पुत्रूड...शिवाजी चौगुले व त्यांच्या पत्नी प्रियांका यांनी तुळशीमाळ घालून वारीची परंपरा अखंडपणे सुरू ठेवली आहे.

!!पंढरीची वारी आहे माझे घरी। आणिक न करी तीर्थव्रत !!

!! व्रत एकादशी करीन उपवासी। गाईन अहर्निशी मुखी नाम !! नाम विठोबाचे घेईन मी वाचे। बीज कण्यांतीचे तुका म्हणे...!!

वारकऱ्याऱ्यांचा पोपाख पांढरा शुभ्र कुडता, धोतर व डोक्यावर टोपी, गळ्यामध्ये तुळशीच्या माळा, हातामध्ये भगवा पताका व कपाळावर गंध, भजन-कीर्तनामध्ये ते. धुंद असतात. धुंद असतेवेळी बघताना असे वाटते की, आपणही त्यांच्यामध्ये मग्न व्हावे, म्हणून आयुष्याला येऊन एक तरी वारी आचरावी... पंढरपूरची...!! !!

!! जय जय राम कृष्ण हरी !!



**ह.भ.प.शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**मु.पो.मासा बेलेवाडी.**
**कागल-कोल्हापूर.९८६७७३२५०४**

---

# वडाळा गांवचे तीर्थक्षेत्र श्री प्रतिपंढरपूर

आषाढी एकादशी म्हणजे पंढरीचा मानाचा दिवस. आपल्या या विठुरायाचे दर्शन घेण्याच्या लगबगीने सारे वारकरी वारी करीत पंढरीची पायी वाटचाल करीत असतात. टाळ मृदुंग, ग्यानबा तुकाराम, जय हरी विठ्ठल, जय जय विठ्ठल या जयघोषात या विठुरायाचे नामस्मरण करीत वारकरी विठ्ठलाच्या नामस्मरणात लीन होताना दिसतात.

प्रत्येक विठ्ठलभक्ताला आपल्या देवाचे दर्शन व्हावे असे वाटत असते. परंतु प्रत्येकालाच वारीला जाण्याची संधी मिळेलच असे नाही. असंच मुंबईकरांच्या बाबतीत काही दिसून येते. मुंबई मधील भक्तांना या विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपूरला जाणे शक्य होत नाही. अशावेळी हे भक्त मुंबईतील वसलेल्या वडाळा गावांत ‘‘ श्री. प्रतिपंढरपूर ‘‘ या मंदिरात वारी काढतात. मुंबईतील पंढरीत टाळ मृदुंगाचा नाद, वैष्णवांचा मेळा, भगवा पताका, विद्युत रोषणाई हे सारे दृश्य पाहायला मिळते. अशाच मुंबईतील प्रसिद्ध प्रतिपंढरपूर ‘‘ म्हणजेच वडाळा गांवातील विठ्ठल रुक्मिणी मंदिर. मंदिराचा विस्तार वाढवण्यात आला असून मंदिराचा कळस हा भागवतभक्त सोनोपंत दांडेकर यांनी बसवला होता असे सांगितले जाते.

मुंबईतील ज्यांना पंढरपूर येथे जाणे शक्य होत नाही, त्यांच्यासाठी हे मंदिर एक प्रतिपंढरपूर म्हणून उभे आहे. मंदिरात आषाढी एकादशीला लाखो भाविकांची गर्दी दिसून येते. मुंबईतील कुलाबा आणि अनेक ठिकाणाहून येथे वारक-यांच्या दिंड्या येतात. जत्रेचा उत्साह ही असतो. असे हे मंदिर पूर्वाभिमुख असून संपूर्ण संगमरवरी आहे. मंदिरात प्रथम प्रवेश करताना आपल्या नजरेस पडते ती काळ्या पाषाणातील गरुड देवाची मूर्ती, बाजूला शनी देवाचे मंदिर,




आत गेल्यावर श्री. मारुतीरायाची मूर्ती, पुढे गेल्यानंतर मुख्य गाभा-यात दर्शन घडते सुंदर काळ्या पाषाणातील विविध आभूषणे आणि अलंकाराने नटलेली विठ्ठल-रखुमाईची मूर्ती. या मंदिरच्या उजव्या बाजूला महादेवाचे मंदिर असून डाव्या बाजूला श्रीदत्त, देवीचे गणपतीचे मंदिर आहे, मंदिरात पहाटे काकड आरती, दुपारी १ आणि सायंकाळी ७ वाजता आरती तर रात्री ९.३० वाजता शेजारती होत असून दररोज सायंकाळी ५ ते ७ वाजता आणि रविवारी ४ ते ७ हरिपाठ प्रवचन असा हा मंदिराचा कार्यक्रम असतो. दशमीपासून भजन सुरु होऊन ते आषाढी एकादशीच्या रात्री पर्यंत भजन सुरु असते. आषाढीला लाखो वैष्णवांचा मेळा भरतो. संपूर्ण मंदिर हरिनामाच्या जपाने दुमदुमून जातो. मंदिरातील विठ्ठल रखुमाईच्या मूर्तींची पूजा आषाढी एकादशीला राजकीय पुढारी व्यक्तींच्या हस्ते केली जाते.

मुंबईतील प्रसिद्ध मंदिरांपैकी हे एक विठ्ठल रुक्मिणी मंदिर. मंदिर पुरातन असून जवळ जवळ ४०० वर्षे जुने आहे. या मंदिराच्या स्थापनेविषयाची गोष्ट ऐकण्यासारखी आहे. पूर्वी मुंबई हि सात बेटांची होती. त्यातील वडाळा हे एक बेट किंवा गांव. वडाळा गांव हे प्रसिद्ध होते, ते येथील मिठागरांसाठी. अशा या मिठागरात लमाणी, शेतकरी, कोळी, आगरी अशी अनेक लोक राहत होते. मिठाचा व्यापार करणे या त्यांचा व्यवसाय. व्यापार करणारे व्यापारी हे विठ्ठलाचे आणि तुकाराम महाराजांचे भक्त असून ते नित्यनियमाने वारीला पंढरपूरला जात असे. एक दिवशी काम करताना या मिठागरात काम करणा-या विठ्ठल-रखुमाईच्या मूर्ती सापडल्या. सदर घटना व्यापा-यांनी पंढरपुरास जाऊन तुकाराम महाराजांना सांगितली असे म्हणणे आहे, त्यांनी सांगितले या मुर्त्या ज्या ठिकाणी सापडल्या त्या ठिकाणी विठ्ठल-रखुमाईचे मंदिर स्थापन करा. व्यापा-यांनी त्या परिसरात एक तळ होतं तेथे मंदिर उभारले. मंदिराचा विकास होत गेला तस तसे या मंदिराचा पाय रचत गेला. आणि आज या मंदिरात गेल्यावर समाधान मिळाल्याशिवाय बाहेर येऊच शकत नाही. ही खरी मंदिराची ख्याती आहे. म्हणून हे विठ्ठल रुक्मिणी मंदिर ‘‘श्री. प्रतिपंढरपूर ‘‘ तीर्थक्षेत्र म्हणून ओळखले जाते.



**लेखक**
**दिनेश जयराम हुमणे,**
**डोंबिवली,**
**९८३३५५७०४४**

---

## विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या माजी सैनिक, वीरपत्नी व पाल्यांसाठी विशेष गौरव पुरस्कार; अर्ज करण्याचे आवाहन

**जालना - प्रतिनिधी**

विविध क्षेत्रात उल्लेखनीय व अतिउत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या माजी सैनिक, वीरपत्नी तसेच त्यांच्या पाल्यांना सन २०२५-२६ या वर्षासाठी एकरकमी १ लाख ते २ लाख रुपयांपर्यंत ‘विशेष गौरव पुरस्कार’ देण्यात येणार आहेत. पात्र लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज १५ सप्टेंबर २०२६ पर्यंत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, जालना येथे सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

या पुरस्कारासाठी शैक्षणिक, क्रीडा, कला, सामाजिक कार्य, उद्योग, पर्यावरण तसेच नैसर्गिक आपत्तीमध्ये केलेल्या उल्लेखनीय कार्याचा विचार करण्यात येणार आहे.

शैक्षणिक क्षेत्रातील पात्रता : इयत्ता दहावीमध्ये किमान ९० टक्के व बारावीमध्ये किमान ८५ टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळविलेले माजी सैनिक किंवा वीरपत्नींचे पाल्य पात्र राहतील. तसेच पदवी किंवा पदव्युत्तर परीक्षेत विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळविलेला किंवा , , यांसारख्या नामांकित संस्थांमध्ये प्रवेश मिळविलेल्या विद्यार्थ्यांनाही या पुरस्कारासाठी अर्ज करता येणार आहे.

क्रीडा क्षेत्रातील पात्रता : राष्ट्रीय किंवा राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये सुवर्ण, रौप्य अथवा कांस्यपदक प्राप्त केलेले खेळाडू तसेच आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केलेले खेळाडू पात्र राहतील. संबंधित क्रीडा प्रमाणपत्रे Indian Olympic Association, Sports Authority of India किंवा संबंधित National Federation यांच्याकडून प्रमाणित असणे आवश्यक आहे.

कला व सांस्कृतिक क्षेत्र : साहित्य, संगीत, गायन, वादन, नृत्य तसेच इतर कला क्षेत्रात राष्ट्रीय किंवा राज्यस्तरीय पुरस्कार अथवा उल्लेखनीय कामगिरी केलेल्या व्यक्तींनाही या पुरस्कारासाठी अर्ज करता येईल.

इतर क्षेत्रांतील पात्रता : पूर, भूकंप, वादळ, आग, दरोडा किंवा अपघात यांसारख्या नैसर्गिक अथवा आपत्तीजन्य परिस्थितीत बहुमोल योगदान दिलेल्या व्यक्ती, यशस्वी उद्योजक तसेच सामाजिक कार्य आणि पर्यावरण संवर्धन क्षेत्रात पुरस्कार प्राप्त व्यक्ती देखील अर्ज करण्यास पात्र आहेत.

अर्जासोबत संबंधित कामगिरीचे पुरावे, पुरस्कारांची प्रमाणपत्रे, वर्तमानपत्रातील प्रसिद्धीची कात्रणे, छायाचित्रे तसेच आवश्यक कागदपत्रे जोडणे बंधनकारक आहे.

इच्छुक व पात्र माजी सैनिक, वीरपत्नी आणि त्यांचे पाल्य यांनी आपले अर्ज १५ सप्टेंबर २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, जालना येथे सादर करून या विशेष गौरव पुरस्कार योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाने केले आहे.

---

# चरणसेवाने जपले लाखो वारकऱ्यांचे आरोग्य; ४.९६ लाखांहून अधिक वारकऱ्यांना लाभ







**मुंबई - प्रतिनिधी**

गेल्या पंधरा दिवसांपासून सुरू असलेल्या चरणसेवा उपक्रमाचा समारोप शुक्रवार, दि. २४ जुलै रोजी होणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षामार्फत लोकसहभागातून हा उपक्रम राबविण्यात आला. यंदाच्या आषाढी वारीत राज्यातील १४ जिल्ह्यांतील ४ लाख ९६ हजारांहून अधिक वारकऱ्यांनी थेट चरणसेवा आणि आरोग्यसेवेचे लाभ घेतला.

आषाढी वारीदरम्यान वारकऱ्यांना होणारा शारीरिक ताण, स्नायूदुखी, पायांना येणारे फोड, थकवा तसेच पावसाळ्यातील संसर्गजन्य आजारांचा धोका लक्षात घेऊन हा उपक्रम राबविण्यात आला. मागील वर्षी सात जिल्ह्यांमध्ये सुरू झालेल्या या उपक्रमाचा यंदा विस्तार करून तो दिंडी मार्गावरील १४ जिल्ह्यांमध्ये राबविण्यात आला.

या चौदा जिल्ह्यांत उपक्रम :सातारा, पुणे, सोलापूर, नाशिक, बुलढाणा, अकोला, जालना, बीड, नांदेड, छत्रपती संभाजीनगर, वाशिम, सांगली, अमरावती आणि अहिल्यानगर या जिल्ह्यांतील १४० मुक्कामस्थळांवर सेवा केंद्रे उभारण्यात आली. या केंद्रांमधून वारकऱ्यांना चरणसेवा, मोफत आरोग्य तपासणी, फिजिओथेरपी, प्रथमोपचार, आवश्यक औषधांचे वितरण, रुग्णवाहिका सुविधा तसेच गरजेनुसार पुढील उपचारांची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली.

३ हजार लिटर आयुर्वेदिक औषधी तेलाचा वापर : या उपक्रमात १६४ आरोग्य संस्थांनी सहभाग घेतला. ७ हजार ५३८ स्वयंसेवक तसेच ११ हजार ३३१ डॉक्टर, वैद्यकीय प्रशिक्षणार्थी विद्यार्थी आणि आरोग्य कर्मचाऱ्यांनी सेवाकार्यात योगदान दिले. सेवेसाठी १० हजार टी-शर्ट आणि ३ हजार लिटर आयुर्वेदिक औषधी तेलाचा उपयोग चरणसेवेसाठी करण्यात आला. तसेच ८ रथांद्वारे जनजागृती करण्यात आली. लोकसहभागातून साकारण्यात आलेल्या या उपक्रमातून तब्बल ४ लाख ९६ हजारांहून अधिक वारकऱ्यांना प्रत्यक्ष चरणसेवा आणि आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यात आली. दिंडीत अवयव दानावर जनजागृती : उपचारांबरोबरच आरोग्य जनजागृतीलाही विशेष महत्त्व देण्यात आले. आरोग्य जनजागृती रथांद्वारे स्वच्छता, सुरक्षित पिण्याचे पाणी, संसर्गजन्य आजारांपासून बचाव, रक्तदान, अवयवदान संदर्भात जनजागृती, निरोगी जीवनशैली तसेच केंद्र व राज्य शासनाच्या विविध आरोग्य योजनांची माहिती वारकऱ्यांपर्यंत आरोग्य रथाच्या माध्यमातून पोहोचविण्यात आली

प्रतिक्रिया : राज्यातील १४ जिल्ह्यांमध्ये ४ लाख ९६ हजारांपेक्षा अधिक वारकऱ्यांपर्यंत चरणसेवा पोहोचविता आली, याचा आनंद आहे. या उपक्रमाच्या यशामागे लोकसहभाग हीच सर्वात मोठी ताकद ठरली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेला विविध आरोग्य संस्था, दानशूर व्यक्ती, डॉक्टर, वैद्यकीय प्रशिक्षणार्थी विद्यार्थी, आरोग्य कर्मचारी आणि हजारो स्वयंसेवकांनी दिलेल्या मोलाच्या सहकार्यामुळे हे सेवाकार्य यशस्वी झाले.

रामेश्वर नाईक
कक्ष प्रमुख, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्ष

# मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त जालना महानगराच्या वतीने भव्य रक्तदान

## समाजसेवाच देवेंद्र फडणवीस यांच्या कार्याची खरी ओळख – भास्कर दानवे

**बदलता महाराष्ट्र वृत्तसेवा**

जालना (प्रतिनिधी) : महाराष्ट्राचे लोकप्रिय व विकासाभिमुख मुख्यमंत्री मा. ना. श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी जालना महानगरच्या वतीने जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील चार ठिकाणी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या समाजोपयोगी उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. मंडळ अध्यक्ष महेश निकम (मुक्तेश्वर लॉन्स, जुना जालना), सुनील खरे (बाथ्री तेली पंचायत भवन, नवीन जालना), अमोल धानुरे (रुपम हॉल, पूर्व जालना) आणि संजय डोंगरे (रामनगर सा.का., ग्रामीण) यांच्या नेतृत्वाखाली शहरातील चार ठिकाणी रक्तदान शिबिरे उत्साहात पार



पडली. या शिबिरांमध्ये नागरिक, युवक, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. एकूण २३५ रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त समाजसेवेचा प्रेरणादायी संदेश दिला. यावेळी बोलताना भाजप जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी नेहमीच समाजहिताला प्राधान्य देत विकासाभिमुख आणि जनकल्याणकारी शासन दिले आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त केवळ शुभेच्छा देण्यापेक्षा समाजोपयोगी उपक्रम राबविणे हेच त्यांना खरी शुभेच्छा, रक्तदान हे श्रेष्ठ दान असून, एका रक्तदात्यामुळे अनेकांचे प्राण वाचू शकतात.

भारतीय जनता पार्टी ही केवळ राजकीय पक्ष नसून समाजसेवा हेच आपले प्रमुख ध्येय मानणारी संघटना आहे आणि अशा उपक्रमांच्या माध्यमातून समाजाप्रती आपली बांधिलकी कायम जपली जाईल. या रक्तदान शिबिराला कार्यकर्ते, पदाधिकारी, युवक तसेच नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने रक्तदान केले. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या सामाजिक उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# जालन्यात २ ऑगस्टपासून प. पू. आचार्य श्री पवित्रसागरजी महाराजांचा चातुर्मास

## २६ जुलै रोजी होणार मंगल प्रवेश




**जालना - प्रतिनिधी**

जालना येथील काद्राबाद स्थित श्री १००८ चिंतामणी पार्श्वनाथ अग्रवाल दिगंबर जैन मंदिरच्यावतीने यावर्षीचा पवित्र मंगल वर्षायोग अर्थात चातुर्मास अत्यंत उत्साहात साजरा करण्यात येणार असून, त्यासाठी प. पू. वात्सल्यमूर्ती आचार्य श्री १०८ पवित्रसागरजी महाराज, त्यांचे परम शिष्य प. पू. मुनिसंघ १०८ प्रशांतसागरजी महाराज व प.पू. मुनिसंघ १०८ प्रभावसागरजी महाराज यांचे सानिध्य जालनावासीयांना लाभणार आहे.

प. पू. आचार्यश्री आणि त्यांचा मुनिसंघ दि. २६ जुलै रोजी सकाळी ८ वाजता गांधी चमन येथून शहरात मंगल प्रवेश करणार आहे. त्यानंतर दि. २ ऑगस्ट रोजी छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरातील श्री गुरु गणेश सभागृहात चातुर्मास कलश स्थापना आणि अधिकृत वर्षायोग प्रारंभ सोहळा संपन्न होणार आहे.

या पवित्र चातुर्मास कालावधीत शहरात ज्ञानगंगेचा अविरत प्रवाह राहणार असून, जैन श्रावक-श्राविकांना ज्ञानामृत प्राशन करून पुण्यार्जन करण्याची संधी मिळणार आहे. प्रत्येक रविवारी आणि विशेष तिथीला दुपारी ३ वाजता अग्रसेन भवन, नेहरु रोड, जालना येथे आचार्यश्रींचे विशेष प्रवचन होणार आहे. दैनंदिन कार्यक्रमात सामायिक, प्रतिक्रमण, भक्ती, पंचामृत अभिषेक पूजन, स्वाध्याय आणि मुनिसंघ आहार चर्या यांचा समावेश आहे. याशिवाय चातुर्मास कालावधीत अष्टाह्निक पर्व, गुरुपौर्णिमा, रक्षाबंधन, दशलक्षण पर्व, क्षमावणी पर्व, विजयादशमी *(पान २ वर)*

# टेम्भूर्णी येथील राजमाता जिजाऊ इंग्लिश स्कूलमध्ये लोकमान्य बाळ गंगाधर टिळक जयंती उत्साहात साजरी




**दत्ता देशमुख**

राजमाता जिजाऊ इंग्लिश स्कूल, टेंभुर्णी येथे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या प्रारंभी लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी. स्वराज फलके , आराध्या उबरहंडे, रणवीर म्हस्के, आरुषी जाधव, सृष्टी सतीश चके, सृष्टी तायडे, नयना मोरे, स्वरूपा उखर्डे, आर्यन खांडेभराड , शिवराज जगदाळे, ऋतुजा मोरे विद्यार्थ्यांनी लोकमान्य टिळक यांच्या जीवनकार्यावर भाषणे सादर केली. ''स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच'' हा त्यांचा प्रेरणादायी संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आला. मुख्याध्यापक संजय फलटणकर यांनी टिळकांचे स्वातंत्र्यलढ्यातील योगदान, शिक्षण, समाजजागृती आणि राष्ट्रनिर्मितीतील कार्य याविषयी मार्गदर्शन केले. टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव व शिवजयंती उत्सवांद्वारे राष्ट्रीय एकात्मता आणि स्वातंत्र्याची प्रेरणा दिली, यावर विशेष प्रकाश टाकण्यात आला. कार्यक्रमास शाळेचे प्राचार्य श्री. संजय फलटणकर, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वनिता सुद्रिक यांनी केले तर शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# महात्मा जोतीराव फुले द्विजन्म शताब्दी वर्षानिमित्त पशुसंवर्धन विभागात विविध उपक्रमांचे आयोजन

## पशुपालकांसाठी जंतनाशक, वंध्यत्व निवारण शिबिरे व तांत्रिक मार्गदर्शन चर्चासत्रांचे वेळापत्रक जाहीर

**जालना - प्रतिनिधी**

महान समाजसुधारक महात्मा जोतीराव फुले यांच्या जयंतीला २०२७ मध्ये २०० वर्षे पूर्ण होत आहेत. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री यांच्या निर्देशानुसार वर्ष २०२७ हे महात्मा जोतीराव फुले द्विजन्मशताब्दी वर्ष म्हणून साजरी करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. यानिमित्ताने राज्य शासनाच्या पशुसंवर्धन विभागामार्फत राज्यभरात विविध शेतकरी-हितोपयोगी उपक्रम राबवले जाणार असून, याबाबतचे सविस्तर वेळापत्रक व मार्गदर्शक सूचना विभागाकडून प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. पशुसंवर्धन विभागातर्फे या उपक्रमातंर्गत जुलै २०२६ ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत प्रत्येक गावात जंतनाशक शिबिरांचे आयोजन केले जाणार आहे. जुलै २०२६ ते फेब्रुवारी २०२७ दरम्यान गायी व म्हशींमधील वंध्यत्व निवारणासाठी विशेष तपासणी व उपचार शिबिरे घेतली जातील. मार्च २०२७ ते एप्रिल २०२७ या काळात पशुसंवर्धनविषयक आधुनिक तांत्रिक माहिती व मार्गदर्शनासाठी चर्चासत्रांचे आयोजन केले जाईल.

**उपक्रमांचे वैशिष्ट्ये व महत्व :**

जंतनिर्मूलन मोहीम : जनावरांमध्ये जंतांचा प्रादुर्भाव झाल्यास त्यांचे वजन घटणे, भूक मंदावणे, रोगप्रतिकारक शक्ती कमी होणे व विविध आजारांमुळे पशुधन मृत्युमुखी पडण्याचा धोका असतो. यासाठी पशुवैद्यकीय दवाखान्यांतील औषधांचा वापर करून प्रत्येक गावात जंतनाशक शिबिरांद्वारे नियमित जंतनिर्मूलन केले जाणार आहे.

वंध्यत्व निवारण शिबिरे : दुग्धव्यवसाय फायदेशीर ठरण्यासाठी जनावरांचे नियमित वेत होणे आवश्यक असते. जनावरांमध्ये वंध्यत्व आल्यास प्रतिवर्षी वेत न मिळाल्याने संगोपनाचा खर्च वाढून पशुपालक तोट्यात जातात. यावर उपाय म्हणून प्रत्येक गावात शिबिरांचे आयोजन करून गायी व म्हशींची वंध्यत्व तपासणी व उपचार केले जातील.

तांत्रिक चर्चासत्रे व तज्ज्ञांचे मार्गदर्शन : पशुपालकांना आधुनिक पशुसंवर्धनाची माहिती मिळावी यासाठी कृषी विज्ञान केंद्र आणि पशुवैद्यकीय महाविद्यालयातील तज्ज्ञ डॉक्टरांना निमंत्रित करून प्रत्येक गावात तांत्रिक चर्चासत्रे आयोजित केली जातील. पशुसंवर्धन विभागाच्या *(पान २ वर)*

# मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त जालन्यात रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

## मान्यवरांच्या उपस्थितीत ७५ दात्यांनी केले रक्तदान

**बदलता महाराष्ट्र वृत्तसेवा**

जालना (प्रतिनीधी) - महाराष्ट्राचे कुशल व कर्तबगार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत आयोजित करण्यात आलेल्या रक्तदानाच्या उपक्रमात सहभागी होत ७५ दात्यांनी रक्तदान केले.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपला वाढदिवस अत्यंत साधेपणाने साजरा करण्याचा निर्णय घेतल्यानंतर राज्यातील जवळपास सर्वच जिल्ह्यात



असलेला रक्ताचा तुटवडा आणि सर्वसामान्य कुटुंबातील रुग्णांना रक्त मिळवण्यासाठी होत असलेली परवड लक्षात घेऊन भाजपाचे प्रदेशाध्यक्ष आ.रवींद्र चव्हाण यांच्या सूचनेनुसार जालन्याचे माजी आमदार तथा भाजपा नेते कैलास गोरंटयाल, भाजपाचे महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर पाटील दानवे, माजी नगराध्यक्षा तथा विद्यमान नगरसेविका सौ.संगीताताई गोरंट्याल, माजी जिल्हाध्यक्ष रामेश्वर *(पान २ वर)*

# ट्रकची विद्युत वाहिनीच्या खांबाला धडक

## गणेशपूर फाटा येथील घटना, अनर्थ टळला

**दत्ता देशमुख**

जाफराबाद- जालना मुख्य रस्त्यावरील गणेशपूर फाटा येथे बुधवारी भरधाव ट्रकने रस्त्यालगत असलेल्या उच्चदाब विद्युत वाहिनीच्या खांबाला जोरदार धडक दिली. सुदैवाने या अपघातात मोठी जीवितहानी टळली. या घटनेमुळे परिसरातील ग्रामस्थांमध्ये घबराट पसरली होती. नियम धाब्यावर बसवून अत्यंत धोकादायक पद्धतीने उभारण्यात आलेल्या या विद्युत



वाहिनीमुळे भविष्यात वाहनांचे मोठे अपघात होऊन मोठा अनर्थ घडण्याची भीती ग्रामस्थांतून व्यक्त केली जात आहे.

जाफराबाद तालुक्यातील अकोला देव तांडा येथे पन्नास एकरांवर नवीन सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याचे काम सुरू आहे. या प्रकल्पातून टेंभुर्णी सबस्टेशन साठी नेण्यात येणारी विद्युत वाहिनी अतिशय निष्काळजीपणे जाफराबाद-जालना मुख्य रस्त्याच्या अगदी जवळून नेण्यात आल्याचा आरोप आहे.

या कामासाठी अत्यंत धोकादायकरीत्या भूमिगत लाईन उच्च दाबाचा वीज प्रवाह केवळ एक फूट खोल नाली काढून जमिनीत गाडल्याचे ग्रामस्थांचे म्हणने आहे. त्यासाठी कोणतीही सुरक्षेची उपाययोजना केलेली नसल्याचा आरोप आहे. गणेशपूर फाटा आणि अकोला देव परिसर हा गावजवळचा रोड टच भाग असून येथे दुकाने व लोकवस्ती वाढत आहे. अशा ठिकाणी १ फूट खोल खड्ड्यात हाय व्होल्टेज वायर असणे म्हणजे थेट मृत्यूला आमंत्रण देणेच आहे. या धोकादायक वाहिनीचा मार्ग तातडीने बदलावा, यासाठी अकोला देव येथील सामाजिक कार्यकर्ते समाधान सवडे यांनी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांना ईमेलद्वारे निवेदन पाठवले आहे. तसेच खासदार डॉ. कल्याण काळे आणि आमदार संतोष पाटील दानवे यांच्याकडेही ही वाहिनी दुसऱ्या मार्गाने हलवण्याची मागणी केली आहे. सबस्टेशन पर्यंत जी स्टेट लाईन टाकलेली आहे. ती रस्त्याच्या कडेलाच घेण्यात आलेली आहे. एका सुज्ञ नागरिकाने असे सांगितले की, त्या कॉन्ट्रॅक्टरला अनेकांनी सांगितले होते की स्टेट लाईन रोड लगत होत आहे यातून अपघात होण्याची शक्यता आहे परंतु त्या कॉन्ट्रॅक्टरने ऐकलेले नव्हते. त्याचा परिणाम हा आज दिसून आला आहे. थोडक्यात अनर्थ कळला नसता फार मोठा अपघात झाला असता आणि आणि जीवितहानी सुद्धा झाली असती. याला जबाबदार असणाऱ्या सर्व यंत्रणांची चौकशी *(पान २ वर)*



जालना येथील प्रति पंढरपूर समजल्या जाणारे आनंदी स्वामी महाराज चे मंदिरात आज श्री दत्तात्रय अवतार यांचे रूप देण्यात आले लहान मुलांची आनंदी स्वामी च्या दर्शनास दिंडी घेऊन आल्याची दिसून येत आहे व आनंदी स्वामी गल्लीत यात्रा भरण्याची दिसून येत आहे. ***छायाचित्र किरण खानापुरे***

# वाढदिवसाचा अनावश्यक खर्च टाळत समृद्धी गायकवाडच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना खाऊ वाटप

**दत्ता देशमुख**

जाफ्राबाद तालुक्यातील नादखेडा येथील कु. समृद्धी दिलीप गायकवाड हिचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने साजरा करण्यात आला. वाढदिवसानिमित्त होणारा अनावश्यक खर्च टाळत तिचे वडील तथा शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दिलीप



गायकवाड यांनी नादखेडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप केले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी नादखेडा गावचे सरपंच बाबासाहेब सवडे, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी बोलताना सरपंच बाबासाहेब सवडे यांनी वाढदिवस साजरा करण्याच्या बदलत्या पद्धतीवर भाष्य करत, ''वाढदिवसाच्या अनावश्यक खर्चाला फाटा देऊन त्या निधीतून मुलांसाठी उपयुक्त शैक्षणिक साहित्य, पुस्तके किंवा समाजोपयोगी वस्तू खरेदी कराव्यात. अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक संदेश जातो,'' असे आवाहन केले.

दिलीप गायकवाड यांनी राबविलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले असून, अशा सामाजिक उपक्रमांतून वाढदिवस साजरा करण्याची प्रेरणा इतरांनीही घ्यावी, अशी भावना व्यक्त करण्यात आली.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.